महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १६३(२)/२०१९/१९ दिनांक- ६ एप्रिल, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-** महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा-२०१९ भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत.
**संदर्भ:-** जाहिरात क्रमांक ४/२०१९, दिनांक ०८/०३/२०१९, अधिसूचना क्र. १२/२०१९ दिनांक ०३/०८/२०१९,

महाराष्ट्र वनसेवा (मुख्य) परीक्षा-२०१९ ची गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दाखल अनुक्रमे मूळ अर्ज क्र. ६९८/२०२१, १३/२०२२ आणि १४०/२०२२ प्रकरणी दिनांक ४ मार्च, २०२२ रोजीच्या न्यायिक आदेशाच्या अनुषंगाने विषयांकित पदाच्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रीयतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या http://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजी १७.०० वाजेपासून दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील. भरती प्रक्रीयेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याची उमेदवारांची विनंती तद्नंतर कोणत्याही कारणास्तव / परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

३. प्रस्तुत परीक्षेच्या भरतीप्रक्रीयेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्याची सुविधा मा. न्यायालय/मा. न्यायाधिकरणांमध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४. भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम शिफारशीकरीता विचार करण्यात येणार नाही.

५. ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब/निवेदने/ पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

६. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाआधारे विषयांकित पदाच्या सुधारीत अंतिम निकाल/शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

७. भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

**ठिकाण- मुंबई.**

**उपसचिव, परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**